सातारा, बुधवार, २८ जानेवारी २०१५ ।

सकाळ

D. P. BHOSALE

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# रयत संस्थेचे कार्याध्यक्ष रावसाहेब शिंदे यांचे निधन



**श्रीरामपूर (जि. नगर), ता. २७ :** ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी व रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे (वय ८६) यांचे पुणे येथे सोमवारी (ता. २६) रात्री साडेदहाच्या सुमारास हृदयविकाराने निधन झाले. माजी केंद्रीय कृषिमंत्री स्व. अण्णासाहेब शिंदे यांचे ते बंधू होत.

१९७८ पासून त्यांनी रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्षपद भूषविले. २००८ मध्ये रयतच्या कार्याध्यक्षपदाची धुरा त्यांच्याकडे सोपविण्यात आली. कर्मवीरांचा वारसा समर्थपणे पेलताना त्यांनी रयतच्या माध्यमातून तळागाळातील विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक सुविधा पुरविल्या. त्यांच्या संकल्पनेतून साकारलेले अनेक शैक्षणिक प्रकल्प रयतच्या माध्यमातून उभे राहिले.

विद्यार्थ्यांसाठी त्यांनी संगमनेरमध्ये आदर्श वसतिगृह उभारले. तसेच श्रीरामपूरमध्ये महाराष्ट्र साहित्य परिषदेची स्थापना केली. त्यांच्या पुढाकाराने रयतच्या येथील रावबहादूर नारायणराव बोरावके महाविद्यालयात उभारण्यात आलेल्या टाटा कॉलसेंटरमुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच रोजगार व आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी मिळाली.

तालुक्यातील पाडळी गावात शिंदे यांचा जन्म झाला. शिक्षणासोबतच शेती व गोपालन या क्षेत्रातच ते सक्रिय होते. राष्ट्रीय सेवा दलात सक्रिय सहभाग असलेल्या शिंदे यांनी स्वातंत्र्यलढ्यातही मोलाची भूमिका बजावली. त्यासाठी त्यांना दोनदा तुरुंगवास भोगावा लागला. अनेक वेळी त्यांनी भूमिगत राहून स्वातंत्र्यलढ्यासाठी गुप्त बैठका घेणे, बुलेटीन काढणे अशी कामे केली. मंगळवारी (ता. २७) दुपारी येथील महादेव मळा येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

................................